पुढारी

# श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

(रजि. क्र. ए.- ७०८)

श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

जावक क्र. २४५२/२०२५ — दिनांक : १६/०१/२०२६

## जाहीर निविदा

श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी या न्यासाच्या वतीने **सालाबादप्रमाणे रविवार दि. १५/०२/२०२६ रोजी महाशिवरात्री उत्सवानिमित्त व इतर कामांच्या** खालीलप्रमाणे कामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत :-

(१) सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त भाविकांना लाइव्ह दर्शन देणेसाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक, श्री खंडोबा मंदिर गडकोट उत्तर महाद्वारचे आतील बाजूस कट्ट्यावर, पहिली पायरी, गडकोट तालीम या ठिकाणी १० बाय १२ साईजची स्क्रीन लावणे. (प्रत्यक्ष चौकशी / माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(२) सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त भाविकांना सुलभ दर्शनासाठी गडकोट परिसर व सज्जावर बंदिस्त दर्शन रांग तयार करणे तसेच सज्जावर दर्शन रांगेत जागोजागी पिण्याच्या पाण्याची, फॅन व्यवस्था, लाईट व्यवस्था ३ दिवस कामगारासहित पुरविणे. (प्रत्यक्ष चौकशी / माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(३) सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त भाविकांना सुलभ दर्शन देणेसाठी व गर्दीचे नियोजन करणेकामी १०० सुरक्षारक्षक (कमांडो) पुरविणे. (माहिती घेऊन कोटेशन भरणे/ प्रत्यक्ष चौकशी)

(४) सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त बंदोबस्ताकरिता येणाऱ्या पोलिस अधिकारी व सुरक्षारक्षक (कमांडो) यांच्या जेवणाची व्यवस्था करणे. (प्रत्यक्ष चौकशी /माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(५) सालाबादप्रमाणे महाशिवरात्री उत्सवानिमित्त/प्रजासत्ताक दिनानिमित्त/माघ पोर्णिमानिमित्त श्री खंडोबा मंदिर गडकोटामध्ये विद्युत रोषणाई करणे. (जनसेटसहित कोटेशन देणे.)

(६) महाशिवरात्री उत्सवानिमित्त ड्रोन शो करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(७) महाशिवरात्री उत्सवानिमित्त/प्रजासत्ताक दिनानिमित्त श्री खंडोबा मंदिरामध्ये आकर्षक फुलांची सजावट करणे. (प्रत्यक्ष चौकशी/माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(८) महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना पिण्याचे पाणी देणेकामी २०० ML ची पाणी बॉटल देवसंस्थानचे नावसहित ४८ नग प्रमाणे ७५० बॉक्स पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(९) महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना प्रसादरूपी उपवासाची चिक्की देणेकामी- चिक्की ३० हजार नग पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(१०) देवसंस्थानकरिता सुरक्षिततेच्या दृष्टीने उच्च प्रतीच्या WALKIE TALKIE चे ६ नग पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(११) देवसंस्थानकरिता सुरक्षिततेच्या दृष्टीने उच्च प्रतीचे HAND HELD METAL DETECTOR ४ नग पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(१२) श्री खंडोबा मंदिर मुख्य गाभाऱ्यामध्ये त्रिकाळ पूजेकरिता लागणारे हार, फुल, वेणी व पाखाळणी वेळी लागणारे हार, फुल, वेणी पुरविणे. (प्रत्यक्ष पाहणी करून व माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(१३) दिव्यांग विवाह सोहळ्यामधील जोडप्यांना भेटवस्तू देणेसाठी उच्च प्रतीचे कपाट पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(१४) श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर प्रथम वर्धापन दिनानिमित्त दि. ३१/०१/२०२६ रोजी साधारण २५०० भाविक भक्तांना महाप्रसादाची/ भोजनाची व्यवस्था करणे.

टीप :- उपरोक्त कामांबाबत ऐच्छिक देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो.क्र.-९३७०४५९४३३/९७६३०४४०१७)

**नियम व अटी :-**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते / उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद करण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु. ५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि. १७/०१/२०२६ ते दि. २१/०१/२०२६ पर्यंत स.१० ते सायं. ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा उघडणेबाबत दिनांक व वेळ ई-निविदाधारकास कळविण्यात येईल.

५. सदरील निविदा देवसंस्थानचे अधिकृत संकेतस्थळ www.khandoba.com येथे उपलब्ध आहे.

६. कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे किंवा निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण**

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

'मल्हार' भक्तनिवास (दुर्गामाता चौक),

जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे

सही/-
**आशिष मारुती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

शिक्का

सही/-
**मंगेश अशोक घोणे**
अध्यक्ष
श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी